# साहित्यातील स्त्रीवाद

# Feminism in Literature



* संपादक *

डॉ. महादेव वाळुंज
डॉ. प्रज्ञा लामतुरे

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Scanned by CamScanner

# साहित्यातील स्त्रीवाद

# Feminism in Literature

* संपादक *
डॉ. महादेव वाळुंज
डॉ. प्रज्ञा लामतुरे

यशोदीप पब्लिकेशन्स,
पुणे-३०.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI *
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Scanned by CamScanner

# साहित्यातील स्त्रीवाद

संपादक : डॉ. महादेव वाळुंज, डॉ. प्रज्ञा लामतुरे

# Feminism in Literature

Editor : Dr. Mahadeo Walunj, Dr. Pradnya Lamture



| | |
|---|---|
| © डॉ. महादेव वाळुंज<br>प्राचार्य, कला महाविद्यालय, भिगवण,<br>ता. इंदापूर, जि. पुणे<br>मो.९३२५४१०८७८ | **प्रकाशक**<br>यशोदीप पब्लिकेशन्स,<br>२१७ ब, जोरी निवास,<br>नारायण पेठ, पुणे-३०.<br>संपर्क क्र. - ९८५०८८४१७५,<br>९०२८७३६००१,<br>(०२०)४१२१७४४१ |
| **प्रथम आवृत्ती**<br>२ जानेवारी २०२० | |
| **अक्षरजुळणी**<br>यशोदीप क्रिएशन्स, पुणे | **मुद्रक**<br>समर्थ प्रोसेस, पुणे. |
| **मुखपृष्ठ**<br>निखिल लंभाते | **मूल्य**<br>₹ ३७०/- |

**ISBN : 978-81-944645-2-5**



ग्रंथामध्ये समाविष्ट लेखांमधील विचारांशी प्रकाशक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| * साहित्यातील स्त्रीवाद | डॉ. तुकाराम रोंगटे | १ |
| * स्त्रीवाद : पाऊलखुणा आणि आजचे वास्तव | डॉ. प्रज्ञा नागेश लामतुरे | २३ |
| * मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | प्रा. डॉ. बागूल. एम.एस. | २८ |
| * स्त्रीवाद : स्वरूप आणि संकल्पना | प्रा.डॉ.म्हस्के सीताराम खंडू | ३३ |
| * स्त्रीवादी साहित्याची पार्श्वभूमी आणि वाटचाल | डॉ. विजय विष्णुपंत केसकर | ४० |
| * स्त्रीवाद स्वरूप आणि संकल्पना | प्रा. दत्तात्रय फटांगडे | ४४ |
| * स्त्रीवाद : स्वरूप आणि संकल्पना | डॉ. संदीप रंगनाथ तापकीर | ४९ |
| * एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारक स्त्रियांच्या चरित्रांचा स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून विचार | जागृती अरुण बधान | ५२ |
| * "स्त्रीवाद आणि गौरी देशपांडे यांचे साहित्य" | डॉ. महादेव वाळुंज | ५९ |
| * स्त्रीवादी साहित्य : स्वरूप व संकल्पना | प्रा. डॉ. प्रवीण ताटेदेशमुख | ६६ |
| * "स्त्रीवाद आणि स्त्रीवादी जाणीवेची कविता" | डॉ. जी.आर. ढेंबरे | ७८ |
| * अर्थकरण व स्त्रीवाद | प्रा. डॉ. दत्तात्रय बारबोले | ८७ |
| * प्राचार्य गो.ग.आगरकरांचे स्त्री-सुधारणेविषयक विचार | श्री. सुरेश नामदेव दांडगे | ९१ |
| * स्त्रीवादी कादंबरी | प्रा.डॉ.कल्पना नारायण गावडे | १०१ |
| * मराठी स्त्रीवादी साहित्य | डॉ. राजाराम गावडे | १११ |
| * स्त्रीवादाची मध्ययुगीन पार्श्वभूमी | प्रा. डॉ. दत्तात्रय डुंबरे | ११६ |
| * स्त्रीवाद : ऐतिहासिक पाऊलखुणा | डॉ. प्रताप मारूती गायकवाड | १२२ |
| * विभावरी शिरूरकर यांच्या साहित्यातील स्त्रीवादी दृष्टिकोन | डॉ. गव्हाणे भाऊसाहेब | १३० |
| * श्री समर्थकन्या वेणास्वामी | प्रा.अपर्णा मल्लिनाथ गुरव | १३६ |
| * साठोत्तरी दलित कवयित्रींची कवितेतून येणारे स्त्रीवादी जाणीवीचे चित्रण | प्रा. शहाजी पारस | १४० |
| * अर्थकारण व स्त्रीवाद | डॉ. साळवे धर्मेंद्र भगवान | १४९ |
| * प्राचीन भारतातील भगवान गौतम बुद्धांचे स्त्रीवादी विचार : एक अभ्यास | प्रा.विकास भानुदास टकले | १५२ |
| * मेघना पेठे यांच्या कथेतील स्त्रीवादी जाणिवा | प्रा. तुकाराम भवर | १५७ |
| * मराठी साहित्यातील स्त्रीवादी कथा | प्रा. डॉ. सुनील निगडे | १६३ |
| * स्त्रीवाद व आदिवासी स्त्री | डॉ. मुक्ता राजेंद्र आंभेरे | १६८ |
| * साहित्यातील स्त्रीवाद | डॉ. सीमा नाईक-गोसावी | १७४ |
| * २००० नंतरची स्त्रीवादी कथा | प्रा.डॉ. महादेव कांबळे | १८२ |
| * मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | डॉ. क्षिरसागर जी. एस. | १८९ |




TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Scanned by CamScanner

# साहित्यातील स्त्रीवाद

## (स्त्रीवाद: स्वरूप व संकल्पना)

डॉ. सीमा नाईक-गोसावी

प्रास्ताविक:

'साहित्यातील स्त्रीवाद' या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्र भिगवण येथील कला महाविद्यालयात संपन्न होत आहे. स्त्रीवाद, साहित्यातील स्त्रीवाद स्त्रीमुक्ती हे विषय जागतिक स्तरावर सर्वत्र कळीचे मुद्दे बनले आहेत. आज मोठया आवेशाने स्त्री-प्रश्नांवर स्त्रियांच्या स्थितीवर चर्चा झडत आहेत. ही चांगली बाब आहे. स्त्री-पुरुष समानतेबद्दल आपल्या भारतीय समाजात जागृती, सजगता वाढीला लागली आहे. या शोधनिबंधात स्त्रीवाद म्हणजे काय? स्त्रीवादाची संकल्पना आणि स्वरूप आणि त्याचे साहित्याशी आणि त्यातूनच प्रत्यक्ष जीवनात जोडले जाणे. त्याचे उपयोजन वाढविणे असा शोध घेण्याचा त्यादृष्टीने प्रयत्न आहे. 'स्त्री ही माणूस आहे' हा माणूसपणाचा विचार तर आहेच परंतु 'मिळून साऱ्याजणी' या स्त्रीविषयक नियतकालिकाने तर LGBT (Lesbian, Gay, Bisexual, Transgender) या दुर्लक्षित व शेकडो वर्ष नाकारलेल्या महाकाय समाजाला स्थान म्हणून "ती' आणि 'तो' या पलीकडचे सर्व 'ते' यांचा स्वत:शी आणि परस्परांशी नव्यानं संवाद व्हावा यासाठी" अशी शीर्ष-रेघ (Tag-Line) अंकाच्या मुखपृष्ठावर मोठ्या गौरवाने दयायला सुरूवात केली आहे (मिळून साऱ्याजणींचे अभिनंदनच!) एकूणच स्त्रीवादाची संकल्पना समजून घ्यायची आहे.

Keywords - स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती, स्त्रीवादी मूल्यदृष्टी, स्त्री-पुरुषसमानता.,

स्त्रीवाद स्त्रियांकडे बघण्याचा एक व्यापक दृष्टिकोन देतो. आज जगभर स्त्रीवादी, स्त्रीमुक्तीवादी चळवळी आपापल्या कुवतीनुसार कार्य करीत आहेत. त्यातून स्त्रीवादाची पार्श्वभूमी तयार झाली आहे. स्त्रीवादी संकल्पनेचा विचार करताना स्त्रीला मध्यवर्ती केंद्र समजून विचार केला जातो. स्त्रीवादाबद्दल बोलताना

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati
TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI



Scanned by CamScanner

सुमती लांडे व श्रुती तांबे म्हणतात, "स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या दृष्टिकोनातून जीवनाच्या सर्व पैलूंवर टाकलेला दृष्टिक्षेप. स्त्रीवाद ही एक जाणीव आहे. ते एक जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. तो एक सैद्धांतिक दृष्टिकोन आहे. त्याचप्रमाणे तो संघटित कृतीसाठी साददेखील आहे. त्यामुळे स्त्री-पुरुषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना म्हणजे स्त्रीवाद. वैयक्तिक आयुष्यात स्त्रीवाद आपल्या पातळीवर जगण्यात उतरवता येतो. आपण कोणत्याही क्षेत्रात काम करीत असू, तरी तिथेही तो स्वत:चे अस्तित्व देणारे तत्त्वज्ञान म्हणून त्याचे अस्तित्त्व दिसते. म्हणजेच स्त्रीवाद हे एक पोथीबद्ध, कर्मठ, एकसाची तत्त्वज्ञान नाही आणि नसावे, असे म्हणता येईल. स्त्रीवाद या तात्विक प्रवाहाच्या अंतर्गत अनेक उपप्रवाह असले, तरी या भेदांपलिकडे जाणारी काही समान सूत्रे स्त्रीवादी या म्हणवणाऱ्या सर्वांसाठी अर्थपूर्ण ठरतात. यात त्या-त्या कालखंडात विशिष्ट सामाजिक परिवेशात स्त्रीत्व आणि पुरुषत्वाची व्याख्या कशी ठरते, त्याची कोणती वैशिष्ट्ये. तो-तो समाज ठरवतो हे तपासणे, स्त्री-पुरुषांच्या वर्तन प्रकारातील भिन्नतेमागची समाजनिर्मित कारणे कोणती-हे खोलात जाऊन तपासणे, पुरुषप्रधान व्यवस्थेची आर्थिक, ऐतिहासिक व राजकीय कारणमीमांसा करून स्त्रियांचे दुय्यमत्व कमी व्हावे, स्त्रीदास्याचा अंत व्हावा म्हणून सातत्याने प्रयत्न करणे"१ म्हणजे स्त्रीवाद होय.

स्त्रीवादी विचारसरणीमध्ये 'स्त्री' ही केंद्रबिंदू आहे. 'स्त्री'च्या दृष्टिकोनातून विचारव्यूह मांडणे स्त्रीवादाला अभिप्रेत असते, असे असले तरी समतावादी भूमिकेतून स्त्री-पुरुष समानतेचा विचार करणे ही माणूसकेंद्री भूमिका आहे. स्त्रीवाद हा काही पुरुषविरोधी विचार नाही. तो एकांगी विचार तर मुळीच नाही. स्त्री-पुरुषांमधील भेद हे श्रेष्ठता-कनिष्ठता असे न मानता त्यातील अनेकस्तरीय वर्गीय जाणिवांतून आलेल्या निरीक्षणांचा वेध घेणेही क्रमप्राप्त ठरते. सध्याची परिस्थिती बघता मूल्यांची घसरण होत आहे, सामाजिक परिस्थिती मूल्यांच्या ऱ्हासाला कारण ठरते आहे. हे जर बदलायचे असेल तर परिवर्तनवादी-विचार प्रयत्न करणाऱ्यांना बळ देणारा हा स्त्रीवादी दृष्टिकोन आहे असे वाटते.

स्त्रीवादी चळवळ ही फक्त स्त्रियांनी चालविलेली चळवळ नाही तो मानवमुक्तीसाठी चालविलेला प्रवाह आहे. ज्येष्ठ स्त्रीवादी अभ्यासक व विचारवंत शारदा साठे स्त्रीवाद हा सर्वांग परिपूर्ण तत्त्वज्ञान नव्हे असा विचार मांडताना त्या म्हणतात - "स्त्रीवाद म्हणजे स्त्री-पुरुष समानतेचा आविष्कार घडविण्यासाठी मार्गदर्शन करणारे किंबहुना मदतकारक ठरणारे एक विचारसूत्र आहे. ढोबळमानाने

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI *
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati



Scanned by CamScanner

स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या हक्कांचे आणि अधिकारांचे समर्थन करणारे विचारसूत्र होय. स्त्रियांच्या राजकीय आणि वैधानिक कायदेशीर हक्क, समान संधी, समानस्थान, गर्भपात, कुटुंबनियोजन इ. साठी झालेल्या व होत असलेल्या चळवळींचाही समावेश स्त्रीवादाच्या व्याख्येत होतो''२

स्त्रियांचे हक्क अधिकार, कर्तव्ये, प्रश्न बदलते सामाजिक संदर्भ, उपाय, योजना, प्रस्थापित पुरुषप्रधान समाजरचनेशी असलेला अटळ संघर्ष इ. अनेक गोष्टी एकमेकांमध्ये गुंतलेल्या व बदलत आलेल्या दिसतात. स्त्रीवादी लेखिका, विचारवंत, इतिहासतज्ज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, कार्यकर्त्यांनी स्त्रीवादी संकल्पनेमध्ये मोलाची भर घातली आहे. स्त्रीवादी चळवळ नेहमीच धर्मवाद, वंशवाद, जमातवाद विरोधी भूमिका मांडणारी विचार-प्रणाली आहे. विशिष्ट पिळवणूकीविरोधी स्त्रीवाद जन्माला आला असून असा शोषणरहित-मानवतापूर्ण समाज निर्माण झाल्यावर स्त्रीवाद ही वेगळी प्रणाली शिल्लक राहणार नाही असा आशावाद शारदा साठे व्यक्त करतात.

संत साहित्यातील कवयित्री संत मीराबाई, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, सोयराबाई, वेणाबाई या संत स्त्रियांनी ६ व्या-७ व्या शतकापासून पुरुषप्रधान संस्कृतीचा धिक्कार केलेला आहे. तसेच १८८२ मध्ये पुरुष स्त्रियांशी कसे निष्ठूरपणे वागतात याचे प्रखर विश्लेषण ताराबाई शिंदे 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकामध्ये मांडताना दिसतात. १९ व्या शतकात ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्यांची संख्या मोठी होती. ख्रिस्ती झालेल्या पत्नींची अवस्था त्याकाळी काय झाली असेल? याचा ऊहापोह करताना प्रतिभा रानडे यांनी 'बाबा पदमन्जी, रेव्ह. ना.वा. टिळक यांच्या भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहे. विधवेचे, परित्यक्तेचे जीवन जगत राहणे किंवा ख्रिस्ती होणे हेच पर्याय स्त्रीसमोर उरत होते३ असे त्या लिहितात. स्त्री त्यावेळी अगतिक झालेली अनेक उदावरून दिसून येते. तिच्या पातिव्रत्याबद्दल आणि स्त्रीधर्म कल्पनांमधून उत्पन्न होणारी स्त्रीची गुलामगिरी याबद्दल १८८२ साली प्रसिद्ध झालेल्या 'स्त्री पुरुषतुलना' या पुस्तकात पुरुष प्रधान समाजव्यवस्थेला फटके मारत तिखट भाषेत ताराबाई शिंदे यांनी समाचार घेतला आहे. स्त्रीकडून ठेवलेल्या परंपरागत अपेक्षा ताराबाई तपासून पाहतात त्याला न्याय-अन्यायाचा, सदसद्विवेक बुद्धीचा कस लावतात''४ स्त्रीशिक्षण, बालविवाह, वैधव्य स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन इ. तत्कालीन जाज्वल्य प्रश्नांवर स्त्रीवादी भूमिकेतून प्रतिभा रानडे यांनी पाहिले आहे. १८३२ मध्ये 'दर्पण' नियतकालिक सुरू झाले त्यामधून विधवा विवाहासंबंधी कायदा



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Scanned by CamScanner

करण्याची चर्चाही सुरू झालेली होती. याची नोंद त्या घेतात. जगण्याच्या सर्व प्रश्नांकडे पाहण्यासाठी स्त्रीवाद परिपूर्ण वैचारिक बैठक देवू शकेल का? या प्रश्नावर लोकसाहित्याच्या अभ्यासक संशोधक समीक्षक तारा भवाळकर लिहितात, "स्त्रीवाद हा स्त्रीला समान संधी व समान न्याय देणारा विचार आहे. 'स्त्रीवाद' ही जगण्याची एक बैठक होऊ शकते. मानववमुक्तीच्या प्रदीर्घ प्रवासातला हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. माझी स्त्रीवादाची संकल्पना थोडीशी गांधीवादाच्या जवळ जाते. मात्र स्त्री-पुरुषातील नैसर्गिक आकर्षणाला कमीपणा देणारा गांधीवाद मला अभिप्रेत नाही. शारीरिक आकर्षण हे मानसिक अपराधीपणा निर्माण करणारं असतं हे नीतिमूल्य मला दुटप्पी वाटतं, निर्मळ मैत्री निर्माण होणारी समाजव्यवस्था मला अभिप्रेत आहे. स्त्रीमुक्ती म्हणजे मुक्तलैंगिकता असं जे म्हटलं जातं ते मला बरोबर वाटत नाही."५ स्त्रीवादी चळवळीमुळे स्त्रिया स्त्रियांची दुःख जाणून घेण्याच्या एक समान भूमिकेवर आल्या आहेत"६ स्वतःविषयी, स्वतःच्या शरीराविषयी, मनाविषयी आताशी स्त्रिया बोलू लागल्या आहेत. त्याचे स्वागत केले पाहिजे. काही संशोधक, समीक्षक अभ्यासकांनी स्त्रीवादाविषयी / विविध भूमिका मांडल्या आहेत.

'स्त्रीवादःजग बदलण्याची संधी आहे' असे माया पंडित यांना वाटते. 'स्त्रीवादाची मांडणी देशी पद्धतीने होणे आवश्यक' विद्युत भागवत, 'स्त्रीवाद स्त्रीमुक्ती या विचारसरणी नव्हे जीवनमार्ग' नीलमगोऱ्हे, 'स्त्रीवादात जीवनाचा सर्वकष विचार होणे आवश्यक' असे सुमित्रा भावे यांना वाटते तर रजिया पटेल यांना स्त्रीवाद हा माणूसपणाचा हक्क मिळवण्यासाठीचा प्रयत्न आहे, असे वाटते. स्त्रियांचे दुय्यमत्त्व व्यवस्थात्मक असून त्याला निश्चित अशी आर्थिक कारणं आहेत. स्त्री-पुरुष विषमतेचा प्रश्न हा अतिशय मुलभूत असून त्यांचे स्वरूप सर्वव्यापी आहे, असं मानणं म्हणजे स्त्रीवाद" "स्त्री चळवळींना जनआंदोलनाबरोबर जोडून घ्यावं लागेल कारण समानतेसाठी, अन्यायाविरूद्ध लढा देण्यासाठी स्त्रिया प्रेरित झाल्यातर अतिशय चिवट लढे त्या उभे करू शकतात. स्त्री चळवळीला व्यापक मित्रशक्ती व प्रश्नांशी जोडून घ्यावे लागेल" असा विचार सामाजिक कार्यकर्त्या मुक्ता मनोहर यांनी मांडला आहे. "स्त्रीवाद हा प्रत्येकाच्या अनुभवातून जन्मतो असे शांता गोखले या लेखिकेला वाटते तर गौरी देशपांडे म्हणतात, "स्त्रियांची सर्वांगीण श्रेष्ठता यांची मी ठाम पुरस्कर्ती आहे' तर कवयित्री सराजिनी वैद्य यांना स्त्रीकडे अबला म्हणून पाहोवसे वाटत नाही." असे मत व्यक्त करतात.

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati
TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI



Scanned by CamScanner

'मिळून साऱ्याजणी' या मासिकाच्या संपादक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांना स्त्रीवाद-स्त्रीमुक्ती: बाईपणापासून माणूसपणापर्यंतच्या प्रवासाची संधी आहे असे वाटते त्या म्हणतात, "स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्रीवर ती केवळ एक बाई आहे म्हणून लादलेल्या बंधनापासून मुक्ती. बाईपणापासून माणूसपणापर्यंत तिचा प्रवास व्हावा. यासाठीची संधी स्त्रीजवळ केवळ एका बाईपणाकडे, त्या जैविक वस्तुस्थिती पलीकडे, जे काही सामर्थ्य आहे त्याचा शोध घेण्याची संधी तिला मुक्तपणे मिळणे. शोधातून हाती आलेल्या सामर्थ्याचा पाठपुरावा करून समृद्ध जीवन जगता येणं, हा टप्पा व एक 'बायकी-बाई' आणि 'पुरुषी-पुरुष' या सापळयामधून बाई आणि पुरुष नावाच्या माणसांना सोडवणं आणि त्यांना लिंगभेदा भेदाच्यापलीकडे, माणूसपणाकडे पोचण्यासाठीचे प्रयत्न म्हणजे स्त्रीमुक्तीची चळवळ होय."७

'भारतीय नारी' या आपल्या पुस्तकात साने गुरूजींनी सुद्धा स्त्रीच्या स्मृतीत सांगितलेल्या स्थानमहात्म्याचा ऊहापोह करताना म्हटले आहे की, "स्त्रिया म्हणजे बाहुल्या खायला-प्यायला आणि ल्यायला मिळाले की कृतार्थ मानणाऱ्या, स्त्रियांना का याहून थोर आंनद नको होते? वैचारिक आनंद, ज्ञानाचा आंनद तो का त्यांना नको होता?" स्त्रियांची पूजा-प्रतिष्ठा ज्या ठिकाणी होते तेथे देवता रमतात असे जरी आपण मानत असलो तरी त्याचा प्रतिवाद करताना साने गुरूजींनी स्त्रियांची पूजा म्हणजे त्यांचे स्वातंष्य होऊ शकत नाही असे म्हटले आहे आणि ते रास्तच आहे.

तस्लीमा नसरीन या बंडखोर लेखिकेने तर स्त्रीच्या आत्मभानाला आवाहन केले आहे व म्हटलेय की - "वाटा तुझ्या आहेत क्षितिजाकडे जिथवर पाहशील ते सारं तुझं आहे." स्त्रीवाद, नवा स्त्रीवाद आणि स्त्रीमुक्ती या शब्दांना वेगवेगळया अर्थछटा आहेत. स्त्रियांच्या हक्काची भूमिका घेणे म्हणजे स्त्रीवाद तर 'स्त्रीमुक्ती' मधून स्त्रियांच्या सम्यक स्वातंष्याचा विचार सूचित होतो. नवा स्त्रीवाद या शब्दापेक्षा 'स्त्रीमुक्ती' विचारप्रणालीवर प्रकाश पडतो. स्त्री-स्वातंन्त्य कोणी स्त्रीला देत नाही. तो तिचा हक्क आहे. हे स्त्रीवादाला अभिप्रेत आहे.

१९४९ साली प्रसिद्ध झालेल्या सीमाँदि बूव्हा यांच्या 'द सेकंड सेक्स' या फ्रेंच भाषेत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाने मोठी क्रांती घडविली. बेटी फ्रीडन, केट मिलेट, शूलामिथ फायरस्टोन, ज्युलिएट मिशेल, शीला रोबॉथम अशा अनेक स्त्रीवादी लेखिकांचे काम नव्या स्त्रीवादी सामाजिक विचाराच्या चौकटीत उल्लेखनीय ठरले आहे. पाश्चात्य जगातील पायाभरणी करणाऱ्या या विचारवंताना मोलाचे

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati



Tuljaram Chaturchand College Baramati

Scanned by CamScanner

स्थान आहे.

एकूणच स्त्रीजीवनाची असहायता, युगानुयुगे होणारे स्त्रियांचे शोषण, बौद्धिक आणि नैतिक गुलामगिरीच्या असलेल्या बेडया आणि यासर्व क्लेषामुळे होणारा स्त्रियांचा आक्रोश या सर्वांना आता साहित्यात स्थान मिळू लागलेले दिसते. वरील सर्व गोष्टींचा लेखक-लेखिका जाणीवपूर्वक शोध घेताना दिसतात. प्रा. रा. ग. जाधव, डॉ. वसंत आबाजी डहाके, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. नीलिमा गुंडी इ. लेखक समीक्षकांनी स्त्रियांच्या कवितेचा आस्वादक, सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतराच्या परिप्रेक्ष्यातून, स्त्रीवादी मुल्यदृष्टीने घेतलेला साक्षेपी शोध सर्वांच्या स्मरणात आहेच.

युगानुयुगे स्त्री व दुय्यमत्त्व, तिची शोकांतिका दृष्टीस पडत होतीच पण या मुद्यांना अधोरेखित करून वेगवेगळया न्यायी समतेच्या नजरेने स्त्रीकडे बघणे, साहित्यातून त्या गोष्टींना प्रभावीपणे मांडणे व ती मांडणी पुन्हा चिकित्सकतेने न्याहाळणे, पडताळणे समीक्षणात्मक दृष्टीने तसेच स्त्रीवादी मूल्यदृष्टीने त्याची पुनर्मांडणी करणे असे साहित्याभ्यासातून होत असल्याचे जाणवते आहे. सामाजिक आणि वैचारिक पातळीवर याची जाणीव होऊ लागली आहे.

२० व्या शतकात स्त्रीच्या सामाजिक-सांस्कृतिक व साहित्यिक उभारणीचा काळ होता. एका अर्थाने स्त्रीच्या जाणीव जागृतीला नवे पंख फुटण्याचा तो काळ होता. स्त्रीचे सांस्कृतिक स्थान काय आहे? तिला स्वातंत्र्य कितपत आहे? मानवी इतिहासाने तिच्यापासून काय घेतले? आणि तिला काय दिले? या प्रश्नांनी स्त्रीची अस्वस्थता वाढू लागलेली होती. स्त्रीला दुय्यमत्त्व दिले गेल्याने साहित्यात आणि साहित्य समीक्षेतही स्त्रीवादी दृष्टिकोनाला विशेष स्थान नव्हते कित्येक शतके पुरुषप्रधान संस्कृती, पुरुषप्रधान साहित्य आणि पुरुषप्रधान समीक्षाच प्रचलित होती. शाकुंतलपासून-एकच प्याला पर्यंत सर्व लेखन पुरुषी दृष्टीतून झालेले आहे असे दिसते. सावित्रीबाई फुले व ताराबाई शिंदे यांच्या लेखनाबाबत हे लेखन त्यांचे स्वत:चे नाही अशा शंका घेतल्या गेल्या होत्या. त्याला चर्चेनंतर मान्यता देण्यात आल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. स्त्री लेखन करू शकते, ती स्वतंत्र काही ठाम भूमिका घेऊन विचार मांडू शकते, हेच प्रारंभीच्या समीक्षकांनी मान्य केले नाही. त्यांच्या साहित्याची नोंद वाङ्मयेतिहासकारांनीही घेतली नाही. स्त्री ही विडंबनकविता, कथा लिहू शकते यावर सुद्धा अनेक पुरुष समीक्षकांचा विश्वास बसलेला नाही.

मराठी साहित्यात स्त्रीवादाच्या पाऊलखुणा खूप पूर्वीपासून जाणवत होत्या.

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Scanned by CamScanner

पण १९३३ साली 'कळयांचे नि:श्वास' (कथासंग्रह) व हिंदोळयावर' (कादंबरी) या विभावरी शिरूरकरांच्या लेखनातून स्त्रीचे विशिष्ट अनुभव बोलके झाले. व्यक्तिस्वातंष्य व वास्तववादी जाणिवा त्यांच्या लेखनात जोरकसपणे उमटल्या. इंदिरा संत, शांता शेळके, अरूणा ढेरे, पदमा गोळे इ. कवयित्रीही स्त्री जाणिवांशी बांधिलकी ठेवून लिहित होत्या. त्यानंतर गौरी देशपांडे, मेघना पेठे, उर्मिला पवार, माल्लेका अमर शेख, प्रज्ञा लोखंडे, कल्पना दुधाळ, प्रिया तेंडूलकर, आशा बगे, शांता गोखले यांच्याबरोबरच अश्विनी धोंगडे, नीरजा, अंजली कुलकर्णी, रजनी परूळेकर, कविता महाजन या कवयित्रींनी स्त्रीवादी काव्य समीक्षा लेखन कले.

अलिकडे 'मिळून साऱ्याजणी' मासिकात स्त्रीवादी लेखन, स्त्रीवादी दृष्टीकोनातून समीक्षालेखन प्रकाशित होत आहे. काही त्यातील अनुवादित कथाही विचारप्रवृत्त करायला लावतात. ही स्त्रीवादाची नवी ओळख या कथालेखनातून व समीक्षेतून होत आहे. मिळून साऱ्याजणी मध्ये अनेक विचारप्रवण सदर 'वाचणारे लिहितात', 'बोलकं पत्र' स्त्रीवादी दृष्टिकोनातून समीक्षणात्मक ग्रंथपरिचय, वर्तमान घटनांवरील प्रखर-समतोल भाष्य करणारे लेखन डॉ. विद्या बाळ, डॉ. गीताली वि. म., सरिता आवाड, डॉ. नीलिमा गुंडी, अंजली कुलकर्णी, नीरजा असंख्य लेखिका स्त्रीवादी आणि स्त्रीकेंद्री भूमिकेतून लिहीत आहेत, भूमिका मांडत आहेत. अनेक कार्यकर्त्या स्त्रियांनी आत्मचरित्रे ही लिहिली.

पुणे येथील साहित्यप्रेमी भगिनी मंडळाने स्त्रियांच्या साहित्याचा मागोवा (१८५० ते २०००) व (२००० ते २०१०) असे त्रिखंडात्मक समीक्षा लेखन प्रसिद्ध केले आहे. अजुनही खंडांचे प्रकाशन होत आहे. भारतीय स्त्री साहित्याचा मागोवा' चे खंडही प्रकाशित झालेले आहेत. ही कौतुकास्पद गोष्ट आहे. त्यात डॉ. अरूणा ढेरे, डॉ. मंदा खांडगे, डॉ. साधना दधिच, डॉ. प्रभा गणोरकर यांच्या सहीत अनेक स्त्रीलेखिकांच्या योगदानाची नोंद घेणे महत्त्वाचे ठरते.

केवळ भारतीय स्त्रीअभ्यासावर आधारित अशी स्त्रीवादी समीक्षा दृष्टीत्पत्तीस आणणे शक्य आहे का? याचाही विचार करणे गरजेचे आहे. देशीवादी, स्त्रीवादी साहित्यसमीक्षेची म्हणून काही तत्त्वे मांडता येतील का? हे ही पाहणे महत्त्वाचे आहे. प्राचीन लोकसाहित्यातील स्त्रीगीते, स्त्रीसंतांचे साहित्य, मौखिक परंपरेने चालत आलेली स्त्रीसंकलने - गद्य-पद्य वेचे संत कवयित्रीचे साहित्य, संतांचे साहित्य यातून स्त्रियांच्या लेखनाच्या संरचना शोधता येतील. तशी आपल्याकडे स्त्रियांच्या लेखनाची स्त्रियांच्या आविष्काराची जुनी परंपरा



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati
Scanned by CamScanner

आहे. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, फतिमाबी शेख, मुक्ता मांग साळवे यांच्या लेखनातून स्त्रीवादी विचारसरणीचे लेखन प्रत्ययास येते. नोबेल पुरस्कार प्राप्त लेखिका मलाला युसुफजाई याही अनेकांच्या प्रेरणास्त्रोत ठरत आहेत ही जमेची बाजू आहे. जस-जसा काळ बदलत जाईल तस-तशी स्त्रीवादी विचारसरणी आणि साहित्याकडे पाहण्याची मूल्यदृष्टी विकसित होत जाईल. त्यात भर पडत जाईल परंतु समाजमानसही त्यादृष्टीने बदलणे, घडणे-घडविणे जास्त महत्त्वाचे आहे असे वाटते.

संदर्भ


१. 'स्त्रीवाद' - संपादनः सुमती लांडे / श्रुती तांबे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २००७ मलपृष्ठ (प्रस्तावना)
२. 'स्त्रीवाद' - संपादनः सुमती लांडे / श्रुती तांबे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २००७, पृ.क्र. ४७, ५०, ५३
३. स्त्रीप्रश्नांची चर्चा: एकोणिसावे शतक - प्रतिभा रानडे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५ पृ. ३३२.
४. तत्रैव, पृ. ३३२, ३३३
५. 'स्त्रीवाद' - संपादनः सुमती लांडे / श्रुती तांबे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २००७ पृ. १७५
६. तत्रैव(५), पृ. १७५
७. तत्रैव(५), पृ. ११९
८. साहित्य आणि सामाजिक संदर्भ - डॉ. अंजली सोमण - प्रतिमा प्रकाशन, पुणे -१९८९
९. स्त्री-प्रश्नाची वाटचाल - विद्युत भागवत, प्रतिमा प्रकाशन पुणे, २००४
१०. स्त्रीवादी सामाजिक विचार - विद्युत भागवत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००८
११. स्त्रीविकासाचे नवे क्षितिज, संपा. डॉ. स्वाती कर्वे, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००८


❑❑❑


**डॉ. सीमा नाईक-गोसावी**

सहयोगी प्राध्यापक (पदव्युत्तर मराठी विभाग)

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कला, विज्ञान आणि वाणिज्य, बारामती

भ्रमणभाष : ९८५०९३४३४२

ई-मेल : seemanaik69@gmail.com



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati





Scanned by CamScanner

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला महाविद्यालय, भिगवण




**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये :**

* अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक, सुसज्ज इमारत व शुद्ध पिण्याचे पाणी, समृद्ध ग्रंथालय अभ्यासिका व संगणक लॅब.

* प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष देऊन महाविद्यालयातच भरपूर सराव घेतला जातो. स्पर्धा परीक्षा केंद्र, विद्यार्थी कल्याण योजना, राष्ट्रीय सेवा योजना, भव्य क्रीडांगण व सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती.

* विद्यार्थ्यांचा संपूर्ण अभ्यासक्रम व्यवस्थित वेळेवर पूर्ण केला जातो.

* खाजगी क्लासची गरज नाही. एसएमएस सेवा, वायफाय परिसर, ई-लर्निंग केंद्र १००% यशाची हमी, कॉपी मुक्त परीक्षा, सॉफ्ट स्किल विकास केंद्र, चांगल्या निकालाची परंपरा, भाषा प्रयोग शाळा(इंग्रजी व मराठी), मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग, स्पोकन इंग्रजी कोर्स, साहित्य कला, संस्कृती व विद्यार्थी क्रीडामंच, निसर्ग मंडळ, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र, पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र.

ISBN : 978-81-944645-2-5

यशोदीप पब्लिकेशन्स,
पुणे-३०.

ISBN 978-81-944645-2-5
9 788194 464525
₹ 370/-

Tuljaram Chaturchand College Baramati

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Scanned by CamScanner